# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **29/04/2022**

**Brief of the work done :-**

बाहेर जिल्ह्यातून येऊन वाशिम जिल्ह्यात येऊन दुकाने फोडून चोरी करणाऱ्या अट्टल चोरांना वाशिम पोलीस प्रशासनाने जेरबंद केले आहे.

पुण्य नगरी

## दुकाने फोडणाऱ्या दोन आरोपींना अटक

**वाशीम** : गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी जिल्ह्यात रात्र अन् दिवस गुस्त वाढवून गुन्हेगारावर वचक कायम ठेवला असून जिल्ह्यात विविध ठिकाणी दुकाने फोडल्याप्रकरणी दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून वाहन व चोरी केलेला मुद्देमाल असा एकूण ७ लाख १८ हजार ७४० रूपयेचा मुद्देमाल जप्त केला.



याबाबत रिसोड येथील गजानन श्रीराम खरबळ यांनी १३ फेबुव्रारी रोजी दिलेल्या तक्रारीवरून कलम ४६१, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक बच्चनसिंह यांचे आदेशान्वये पोलीस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांनी पथकास वेगवेगळ्या ठिकाणी गस्त वाढवून माहिती काढण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी जुला सोहीलमिया जुला बासौद (वय २७) रा.ताजनगर दिग्रस, शफीक उर्फ सरफराज मोमीन अलीम मोमीन (वय ३३) रा.कळव जि उस्मानाबाद यांना साफळा रचून ताब्यात घेतले.यावेळी त्यांनी साथीदार शेख फारूख शेख हज्जु र.कळंब जि.उस्मानाबाद व नष्पड उर्फ रईस रा. माजलगांव बीड यांनी मिळून रिसोड, शेलू बाजार व मालेगाव येथील दुकाने फोडुन लाखो रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला होता. यावेळी तिन्ही गुन्हयात चोरी गेलेला ताबा तार व पिव्हीसी वायर, बॅटऱ्या व गुन्ह्यात वापरलेले कार असा एकूण किंमत ७ लाख १८ हजार ७४० रूपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आल. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बच्चनसिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, स्थानिक गुन्हे शाखा वाशीम यांचे पथकातील सपोनी अतुल मोहनकर, पोहेकाँ सुनिल पवार, संतोष कंकाळ, पोना अमोल इंगोले, राजेश गिरी, प्रशांत राजगुरु, राजेश राठोड, अश्विन जाधव, पोकॉ अविनाश वाढे, संतोष शेनकुडे, गजानन गोटे, दिगावर मोरे यांनी सहभाग नोंदविला.

Smart Washim
Page No.4 April 29, 2022